झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स -II, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/झोनिआ/१४३५/२०२५
दिनांक : २० / ०६ /२०२५.

## झोपडपट्टी निर्मूलन आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (ड) सह१२ अन्वये)**

<u>प्रस्तावना -</u>

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

(२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद स.नं.६५३ पै, सि.स.नं.२९४२, २९४३पै, २९९६पै, २९९९/३ ते २९९९/३७, गवळीमाथा नगर, भोसरी, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टीचे क्षेत्रफळ **१५६८९.२५** चौ.मी. या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मालकीच्या जागेवर (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. हिरुंभ इन्फ्रा एल.एल.पी यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रकरणी अधिनियमाच्या कलम ३ क नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारित करण्याबाबत दि.१३/०९/२०२४ रोजी आदेश पारित केले आहेत. सदर आदेशामध्ये उक्त मिळकतीच्या क्षेत्रासंदर्भात तसेच सि.स.नं. च्या उल्लेखामध्ये तफावत आढळून येत असल्याने त्याबाबतचे शुध्दीपत्रक दि.०९/०४/२०२५ रोजी निर्गमित करणेत आले आहे. त्यानंतर सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील विकास नियंत्रण नियमावली, २०२२ यातील नियम क्र. १४.६.१२ (१) च्या तरतुदीनुसार प्रशासकीय मान्यता दि.०२/०४/२०२५ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आली आहे.

(३) सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची प्राथमिक पात्रता यादी (परिशिष्ट २) तयार करुन दि.१६/०८/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून उक्त परिशिष्ट -२ नुसार सदर मिळकतीवर एकूण १२९८ झोपडीधारक असून एकुण ३२८ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत. अद्याप सदर योजनेची अंतिम पात्रता यादी निश्चित करणेत आलेली नाही. त्यामुळे अंतिम पात्रता यादी झालेनंतर पात्रतेमध्ये बदल होऊ शकतो.;

(४) सदर मिळकतीकरीता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारित करणारा अंतिम आदेश दि.१३/०९/२०२४ रोजी पारित करणेत आला आहे. सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणी, सप्टेंबर २६ ते ऑक्टोबर २, २०२४ रोजीच्या राजपत्रात पान क्र. ३२ व ३३ तसेच स्थानिक दैनिक वृत्तपत्रात दि.२०/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आला आहे. तसेच ३ (क) बाबतचे शुध्दीपत्रक दि.०९/०४/२०२५ रोजी

निर्गमित करणेत आले आहे. सदरचे शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक - पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, मे ०८-१४, २०२५, पृष्ठ मध्ये क्र. १५ वर तसेच दैनिक प्रभात व विश्वदर्पण या वृत्तपत्रामध्ये दि.०८/०५/२०२५ रोजी प्रसिध्द करणेत आले आहे.

(५) उक्त झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणा-या अंतिम आदेशास मा. शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई अथवा कोणत्याही न्यायालयाची स्थगिती नाही आणि म्हणून, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी या क्षेत्रातील सर्व इमारती / झोपडया पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ड सह कलम १२ (१) अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे.

(६) विकसक मे. हिरुंभ इन्फ्रा एल.एल.पी यांनी योजनेतील झोपडीधारकासोबत आपआपसात सहमतीनुसार भाडेदर ठरविले असून संक्रमणाची सर्व जबाबदारी आमची राहील. तसेच या बाबत भविष्यात काही वाद विवाद झाल्यास त्याचे निराकरण आम्ही करु व त्याबाबत झोपुप्रा कार्यालयास कोणतीही तोशीष लागू देणार नाही असे रु.५००/- च्या मुंद्रकावरील दि.१८/०६/२०२५ रोजीचे हमीपत्र या कार्यालयाकडे सादर केले आहे. प्राधिकरणाच्या परिपत्रक क्र.१०, दि.१२/१२/२०२३ व शुध्दिपत्रक क्र.१, दि.१४/०२/२०२५ नुसार एक वर्षाचे भाडे अग्रीम स्वरुपात व त्यानंतर पुनर्वसन सदनिकेचा ताबा देईपर्यंत प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीस पुढील-एक वर्षाचे आगावू भाडे सर्व पात्र झोपडीधारकांना विकसकाने अदा करणे अनिवार्य आहे.

(७) झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमातील व विकास नियंत्रण नियमावलीतील सर्व तरतूदींची पूर्तता करण्याच्या आधीन राहून योजनेअंतर्गत पुढील कामकाज पार पाडणे आवश्यक आसल्याची माझी खात्री झाल्याने व अधिनियमांतर्गत अशी कार्यवाही करण्यास सक्षम असल्याने मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे झोपडपट्टी अधिनियमाच्या कलम ३ ड सह कलम १२ (१) नुसार खालीलप्रमाणे झोपडपट्टी निर्मूलन आदेश पारित करत आहे.

<u>आदेश</u> :-

(१) खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी निर्मूलन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

(२) सदर क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकामामधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा विकसक यांचे ताब्यात द्यावी.

(३) अशा रितीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसाचे आंत पाडून टाकून जमीन मोकळी करावी व संक्रमण व्यवस्थेसंदर्भातील अन्य निवासी व्यवस्थेचा विकल्प निवडून तात्काळ स्थलांतरित व्हावे.

(४) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीमधील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्यास राहतील.

(५) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास अथवा झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास अथवा झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा

झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून निष्कासनाच्या कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

(६) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती दोषसिद्धीअंती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव** :- स.नं.६५३ पै, सि.स.नं.२९४२, २९४३पै, २९९६पै, २९९९/३ ते २९९९/३७, गवळीमाथा नगर, भोसरी, पुणे

महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी चिचवड महानगरपालिका.

| ठिकाण- भोसरी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. / फा.प्लॉ.क्र | जमीन/ मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) (प्रस्ताव सादर केलेनुसार झोपडपट्टी खालील क्षेत्र) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा (महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार) | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.६५३ पै, सि.स.नं.२९४२, २९४३पै, २९९६ते २९९९/३ ते २९९९/३७ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | १५६८९.२५ चौ.मी. | सि.स.नं. २९४३पै, २९९६पै, नाला | लागू रस्ता | लागू रस्ता | लागू रस्ता |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- २० / ०६ /२०२५.

(नीलेश गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव.
२. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे-१९ -यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.
३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
४. विकसक मे. हिरुंभ इन्फ्रा एल.एल.पी - यांना पुढील कार्यवाहीस्तव.
५. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे- झोपडपट्टी निर्मूलन आदेश या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावा.